

महाराष्ट्र शासन

# मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज प्रक्रिया







मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ऑनलाइन अर्ज तसेच अर्जदाराची माहिती भरून घेण्यासाठी 'नारिशक्ती दूत - Narishakti doot' हे अँप्लिकेशन मोबाईल मध्ये असणं आवश्यक आहे. हे अँप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी तुमच्या मोबाइल मध्ये 'प्लेस्टोर' या अँप्लिकेशन वर क्लिक करा.





प्लेस्टोर ॲप्लिकेशनवर क्लिक केल्यानंतर 'सर्च बार' मध्ये 'नारिशक्ती दूत - narishakti doot' इंग्रजी मध्ये लिहा. टाईप केल्या नंतर या प्रमाणे ॲप्लिकेशन तुमच्या मोबाईल स्क्रीन वर येईल. ॲप्लिकेशन मोबाइलला स्क्रीन वर दिसल्यानंतर 'इन्स्टॉल - install' बटण वर क्लिक करावे





इन्स्टॉल - install बटण वर क्लिक केल्यानंतर ॲप्लिकेशन डाउनलोड होईल. ॲप्लिकेशन डाउनलोड झाल्यानंतर 'ओपन -Open' असा पर्याय उपलब्ध होईल. अर्जदाराने ओपन - Open पर्यायावर क्लिक करावे.





ओपन - Open पर्यायावर क्लिक केल्या नंतर 'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान' हे अँप्लिकेशन उघडले जाईल आणि तुमची स्क्रीन अशी दिसेल.





स्क्रीन वर असा मेसेज आल्या वर 'while using this app' वर क्लिक करावे





स्क्रीन वर आलेला मजकूर वाचून पुढे जाण्यासाठी Done वर क्लिक करावे





स्क्रीन वर आलेला मजकूर वाचून पुढे जाण्यासाठी वर → क्लिक करावे





या पुढे एप्लिकेशन मध्ये असं पेज ओपन होईल. त्या वर आपला मोबाइल नंबर (आधार कार्ड शी लिंक असलेला) नमूद करावा.





मोबाईल नंबर नमूद केल्या नंतर
'Accept terms and condition'
च्या बाजूला असणाऱ्या चौकोणी
बॉक्स वर क्लिक करावे.





क्लिक केल्या वर अशा प्रकारे अटी व शर्ती दिसतील, या मंजूर असल्यास 'स्वीकारा' वर क्लिक करावे.





अटी व शर्ती मंजूर केल्या नंतरमोबाईल वर प्राप्त झालेला OTP इथे नोंदवावा





या नंतर प्रोफाइल अपूर्ण आहे असा error मोबाईल स्क्रीन वर दिसेल. प्रोफाइल अपडेट करण्यासाठी 'आपली माहिती भरण्यासाठी येथे क्लिक करा’ वर क्लिक करावे





प्रोफाइल अपडेट करण्यासाठी पूर्ण नाव, ई-मेल, जिल्हा, तालुका, नारीशक्ती प्रकार नमूद करावे





# तुमचा नारीशक्ती प्रकार निवडा




माहिती भरल्या नंतर अशा प्रकारची प्रोफाइल तैयार होईल




अर्ज भरण्या आधी योजनेविषयी जाणून घेण्यास तसेच हमीपत्र डाउनलोड करण्यासाठी येथे क्लिक करावे





अर्जदाराने अर्ज भरण्यास सुरुवात करण्या आधी खालील कागदपत्रे तैयार ठेवावीत :


- आधार कार्ड
- बँक खात्याची माहिती
- जन्म प्रमाणपत्र/ शाळा सोडल्याचा दाखला/अधिवास प्रमाणपत्र
- महिलेचा जन्म परराज्यात झाला असल्यास आणि महाराष्ट्र राज्यातील रहिवाश्याशी लग्न झालेले असल्यास, नवऱ्याचे रहिवासी पुरावे
- उत्पन्नाचा दाखला / पिवळे अथवा केशरी राशन कार्ड धारक असल्यास राशन कार्डाची प्रत
- स्वाक्षरी केलेले हमीपत्र

हमीपत्राची कॉपी डाउनलोड करण्यासाठी येते क्लिक करावे


योजनेसाठी लागणारे कागदपत्र जाणून घेतल्यावर अर्ज करण्यास 'नारीशक्ती दूत' यावर क्लिक करावे





मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरण्यास सुरुवात करण्यासाठी या टॅब वर क्लिक करा





अटी व शर्ती स्वीकार केल्या वर अँप्लिकेशन फॉर्म तुमच्या स्क्रीन वर येईल. अँप्लिकेशन फॉर्म भरल्यानंतर सर्वप्रथम अर्जदाराने किंवा अर्ज भरणाऱ्याने महिलेचे संपूर्ण नाव या रकान्यात भरावे (आधार कार्ड प्रमाणे).




अर्जदाराचे नाव भरल्यानंतर जन्मतारीख भरण्यात यावी. त्यासाठी जन्मदिनांक निवडा या ऑपशन वर क्लिक करावे (आधार कार्ड प्रमाणे) .




‘जन्मदिनांक निवडा’ या ऑपशन वर क्लिक केल्या नंतर अशा प्रकारे कॅलेंडर स्क्रीन वर दिसेल. यावर अर्जदाराची जन्मदिनांक, महिना व वर्ष या माहितीची नोंद करावी. आणि ‘ओके – Ok’ पर्यायावर क्लिक करावे.





अर्जदाराचे वय २१ पेक्षा कमी असल्यास किंवा 65 पेक्षा जास्त असल्यास अशा प्रकारचा मॅसेज स्क्रीन वर दिसेल.

असा मेसेज दिसल्यास अर्जदाराने अर्ज भरू नये.




जन्मतारीख भरल्यानंतर अर्जदाराने रहिवासाचा भरावा. रकान्यात दिलेल्या जागी क्लिक करून जिल्हा निवडावा (आधार कार्ड प्रमाणे)




अर्जदाराचा आधार व मोबाईल क्रमांक


अर्जदार शासनाच्या इतर योजनेचा लाभ घेत असल्यास लाभाची रक्कम नमूद करावी

महिलेचा जन्म परराज्यात झाला असल्यास होय अथवा नाही निवडावे. होय निवडल्या वर परराज्य ड्रॉपडाउन निवडावे.




अर्जदाराचे खाते ज्या बँकेत आहे त्याची माहिती अचूक भरण्यात यावी

अर्जदाराचे आधार बँक खात्याशी जोडले आहे का याबाबतची माहित भरण्यात यावी




आधार कार्डाचा पहिला व शेवटचा फोटो अपलोड करावा


महिलेचा जन्म परराज्यात झाला असल्यास आणि महाराष्ट्र राज्यातील रहिवाश्याशी लग्न झालेले असल्यास, नवऱ्याचे रहिवासी पुरावे जोडावे

राशन कार्डाचा पहिला व शेवटचा फोटो अपलोड करावा. महिलेचा जन्म परराज्यात झाला असल्यास नवऱ्याचे पुरावे जोडावे


अर्जदाराचे हमीपत्र अर्जदाराने डाउनलोड करून त्यावर साक्षरी करून अपलोड करावी

अर्जदाराचे बँक पासबुक अपलोड करावे (अनिवार्य नाही)


अर्जदाराचा फोटो अपलोड करावा





कागपत्रे अपलोड केल्यानंतर ‘Accept हमीपत्र डिसकलमेर’ च्या बाजूच्या चौकोनी रकण्यावर क्लिक करावे. हमीपत्रात दिलेल्या बाबी मान्य असल्यास त्यास संमती द्यावी आणि माहिती जतन करा या टॅब वर क्लिक करावे




हमीपत्रात दिलेल्या बाबी मान्य असल्यास त्यास संमती द्यावी आणि माहिती जतन करा या टॅब वर क्लिक करावे




अर्ज भरल्यानंतर व कागदपत्र उपलोड केल्यानंतर भरलेल्या अर्जाचा Preview अशाप्रकारे पाहता येईल. भरलेली माहिती योग्य असल्यास फॉर्म सबमिट करावा.




माहिती जतन केल्यानंतर अँप्लिकेशन नंबर पाहण्यासाठी होम पेज वर जाऊन 'यापूर्वी केलेले अर्ज' या टॅब वर क्लिक करावे

# धन्यवाद